Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education, Pune
S.R.No.832-A, Final Pl No. 178,179, Near Balchitrawani, Behind
Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar,
Pune-411004.

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९,बालचित्रवाणी
शेजारी,आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा,
शिवाजीनगर, पुणे ४११००४

E-Mail- secretary .stateboard @ gmail.com

Tel : Chairman (p) : STD . (020)-25651751 । EPABX -25705000 Secretary(P) : STD . (020)- 25651750

क्र.रा.मं./परीक्षा-८/9328
पुणे-४११००४
दिनांक - १८/०३/२०२१

प्रति,
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

**विषय- नोव्हेंबर-डिसेंबर २०२० च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेस ATKT ने बसून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी इ.१२वी ची ऑनलाईन आवेदनपत्र भरल्याबाबत..**

संदर्भ- आपले पत्र क्र.मुंविमं./उमाप/११५८/ दि.०५/०३/२०२१.

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्रास अनुसरुन कळविण्यात येते की, नोव्हेंबर-डिसेंबर २०२० च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेस प्रविष्ठ होवून उत्तीर्ण झालेल्या **ATKT** धारक पुनर्परिक्षार्थी विद्यार्थ्यांनी इ.१२वी ची ऑनलाईन आवेदनपत्र भरल्याबाबतचा विषय दि.१२/०३/२०२१ रोजीच्या परीक्षा समितीपुढे सादर करण्यात आलेला होता. सदर सभेच्या ठरावानुसार **कोविड-१९ विषाणूच्या पार्श्वभूमीवर उद्‌भवलेल्या परिस्थितीमुळे जुलै-ऑगस्ट २०२० मध्ये होणारी पुरवणी परीक्षा नोव्हेंबर-डिसेंबर २०२० मध्ये आयोजित** करण्यात आलेली होती व सदर परीक्षेचा निकाल दि.२३ डिसेंबर,२०२० रोजी जाहीर करण्यात आलेला आहे, सदर परीक्षेत इ.१०वी उत्तीर्ण झालेल्या व एटीकेटी पात्र विद्यार्थ्यांना सन २०२०-२१ मध्ये इ.११वी मध्ये प्रवेश देण्यात आलेला आहे. त्याप्रमाणेच सदर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेवून कोविड-१९ विषाणूच्या पार्श्वभूमीवर उद्‌भवलेल्या परिस्थितीचा विचार करता **नोव्हेंबर-डिसेंबर २०२० पुरवणी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या एटीकेटी धारक इ.११वीतील विद्यार्थ्यांना यावर्षीपुरती खास बाब म्हणून सन २०२०-२१ मध्ये इ.१२वीत प्रवेशित होण्यास व एप्रिल-मे २०२१ मधील इ.१२वीच्या परीक्षेस प्रविष्ठ होण्यास परवानगी देण्यात येत आहे.**

तरी, उपरोक्त ठरावानुसार विभागीय मंडळ स्तरावरुन कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(डॉ.अशोक भोसले)
सचिव,
राज्य मंडळ,पुणे

क्र.कोविमं/इ-१२ वी परीक्षा/7504
कोल्हापूर ४१६००४
दिनांक १९/०३/२०२१

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा, सांगली, कोल्हापूर.

इयत्ता १० वी नोव्हेंबर-डिसेंबर २०२० परीक्षेस ATKT सह उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची एप्रिल-मे २०२१ इयत्ता १२वी परीक्षेसाठी आवेदनपत्रे भरण्याबाबत वरीलप्रमाणे नोंद घेवून त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

(देविदास कुलाळ)
विभागीय सचिव
म.रा.माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-४१६००४.